# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचं शपथग्रहण–एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ
- विधानसभेचं उद्यापासून तीन दिवसीय विशेष अधिवेशन–९ डिसेंबरला अध्यक्षपदाची निवडणूक
- बीड इथं अकरा वर्षांपूर्वीच्या हत्या प्रकरणात १४ जण दोषी, तर पैठण इथल्या तिहेरी हत्याकांड प्रकरणी मारेकऱ्यास तिहेरी जन्मठेप

आणि

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनासाठी मुंबई महापालिका सज्ज

****

राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी काल शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबईत आझाद मैदानावर झालेल्या या शपथग्रहण सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातले इतर सदस्य, भाजप आणि मित्रपक्षांचे विविध राज्यांचे मुख्यमंत्री, विविध राजकीय पक्षांचे नेते, अंबानी कुटुंबीयांसह अनेक उद्योजक, अभिनेत्री माधुरी दीक्षितसह सिनेसृष्टीतले कलावंत, आणि क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासह अनेक क्षेत्रातले मान्यवर या शपथग्रहण सोहळ्याला उपस्थित होते. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी यावेळी फडणवीस यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली…

**“भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची काल तिसऱ्यांदा शपथ घेतली. फडणवीस यांनी यापूर्वी २०१४–१९ अशी**

**मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेला आहे. २०१४ मध्ये वयाच्या ४४ व्या वर्षी मुख्यमंत्री होणारे फडणवीस हे शरद पवार यांच्यानंतर दुसरे सर्वात तरुण मुख्यमंत्री ठरले होते.**

**कालच्या शपथग्रहण सोहळ्यात एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार विक्रमी सहाव्यावेळी उपमुख्यमंत्रिपदी विराजमान झाले आहेत. तर, मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे एकनाथ शिंदे हे देवेंद्र फडणवीस यांच्यानंतरचे दुसरे नेते ठरले आहेत.**

**गेल्या महिन्यात झालेली विधानसभेची ही निवडणूक भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं एकत्रितपणे महायुती म्हणून लढवली होती. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला आतापर्यंतच्या सर्वाधिक अशा १३२ जागा मिळाल्या. शिवसेनेला ५७ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला. नव्या विधानसभेत सत्ताधारी महायुतीकडे जनसुराज्य पक्ष, राष्ट्रीय युवा स्वाभिमानी पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष आणि काही अपक्ष यांचा पाठिंबा मिळून २३६ पेक्षाही अधिक जागांचं संख्याबळ आहे.**''

दरम्यान, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या शपथग्रहणानंतर नागपूर, परभणी, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर आणि रत्नागिरीसह राज्यभरात महायुतीतल्या घटकपक्षांच्या कार्यकर्त्यांनी आतिषबाजी करून तसंच मिठाई वाटप करून जल्लोष साजरा केला.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या संचिकेवर केली. या माध्यमातून पुणे इथले रुग्ण चंद्रकांत कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी, लाडकी बहीण ही योजना आपलं सरकार सुरूच ठेवणार असून, या योजनेत महिलांना आता दरमहा २१०० रुपये देणार असल्याचं मूद केलं.

दरम्यान, नवनिर्वाचित आमदारांच्या विधानसभा सदस्यत्वाचा शपथविधी आणि विधानसभा अध्यक्षांची निवड करण्यासाठी उद्यापासून विधानसभेचं विशेष अधिवेशन

बोलावलं जाणार आहे. सात, आठ आणि नऊ तारखेला आमदारांचा शपथविधी होणार असून, नऊ तारखेला अध्यक्षांची निवडणूक होणार आहे.

****

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पत्रकार परिषदेत बोलताना, मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत एकत्रित काम करणार असल्याचं सांगितलं. महायुतीत आलो तेव्हा शिवसेनेचे ४० आमदार होते, ते आता ६० झाले आहेत, ही आपल्या कामाची पोचपावती आहे, असं सांगत याचा अभिमान आणि समाधान असल्याचं ते म्हणाले. गेल्या अडीच वर्षात आम्ही जनतेसाठी काम केलं, त्यामुळेच या निवडणूकीत ऐतिहासिक बहुमत मिळालं असं शिंदे यांनी नमूद केलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत अष्टलक्ष्मी महोत्सवाचं उद्घाटन करणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ईशान्येकडील आठही राज्यांची संस्कृती, वस्त्रोद्योग, हस्तकला, पर्यटन स्थळे आणि अद्वितीय उत्पादनं दाखवण्यात येणार आहेत.

****

रिझर्व्ह बँकेचं वित्त धोरण आज जाहीर होणार आहे. बँकेनं फेब्रुवारी २०२३ पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नसून, तो सहा पूर्णांक पाच टक्क्यांवर स्थिर आहे.

****

बीड शहरातल्या बालेपीर भागात अकरा वर्षांपूर्वी खंडणीच्यावरून झालेल्या हत्या प्रकरणात तब्बल पाच वर्षानंतर काल विशेष मोक्का न्यायालयाने १४ जणांना दोषी ठरवलं. शिक्षेची सुनावणी सोमवारी होईल अशी शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथल्या तिहेरी हत्याकांड प्रकरणी जिल्हा आणि सत्र न्यायालयानं दोषी अक्षय जाधव याला तिहेरी जन्मठेपेसह एकूण ४० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. पाच वर्षांपूर्वी ही घटना घडली होती.

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी मुंबईत चैत्यभूमीवर महापालिकेने पायाभूत सुविधा केल्या आहेत. पालिकेकडून नियंत्रण कक्ष, रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालये आदी सोयी-सुविधा उपलब्ध करून

देण्यात आल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रवेशद्वार परिसरात असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला नागरिकांनी अभिवादन करण्याचं आवाहन महापालिकेकडून करण्यात आलं आहे.

****

छाया-प्रकाश फाऊंडेशनचे यंदाचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. अभिनेते भरत दाभोळकर, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, अभिनेते किशोर कदम आणि युवा चित्रकार सिद्धार्थ शिंगाडे यांना यंदा या पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. येत्या २१ डिसेंबरला हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. एक लाख रूपये रोख आणि मानपत्र असं पुरस्कारांचं स्वरूप आहे. याच कार्यक्रमात दोन शिक्षकांचा गौरव केला जाणार असून, २९ गुणवान विद्यार्थ्यांना ८ लाख रुपये रकमेची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि दिल्ली उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती अजित शहा यांनी ही माहिती दिली.

****

सिंगापूर इथं सुरु असलेल्या, यंदाच्या फिडे जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत, भारताच्या डी. गुकेश आणि चीनच्या डिंग लेरेन यांच्यातली आठवी फेरीही अनिर्णित राहिली. दोघांनाही प्रत्येकी ४ गुण मिळाले असून त्यांच्यातील अनिर्णित राहिलेली ही सलग पाचवी फेरी आहे. या स्पर्धेचं अजिंक्यपद जिंकण्यासाठी दोघांनाही प्रत्येकी ३ पूर्णांक ५ दशांश गुणांची आवश्यकता आहे.

****

भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आजपासून ॲडलेड इथं खेळला जाणार आहे. पहिला सामना जिंकून भारत मालिकेत एक - शून्यनं आघाडीवर आहे.

****

महिला क्रिकेटमधे, ब्रिस्बेन इथं झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताचा संघ ३५ व्या षटकातच १०० धावा करुन सर्वबाद झाला. ऑस्ट्रेलियानं सतराव्या षटकात पाच गड्यांच्या मोबदल्यात ही धावसंख्या पार केली. भारतातर्फे रेणुका सिंहनं तीन तर प्रिया मिश्रानं दोन गडी बाद केले.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे चार विद्यार्थी युरोप खंडातील एस्टोनिया या शहरात होणाऱ्या जागतिक रोबोटिक स्पर्धेकरिता रवाना झाले. मनपा पदाधिकाऱ्यांनी या चमूला शुभेच्छा दिल्या.

****

जालना शहर महानगरपालिकेच्या अधिकृत परवानगीशिवाय शहरात बेकायदेशीररित्या होर्डिंग आणि फलक लावणाऱ्या २२ आस्थापनांवर महापालिका प्रशासनानं गुन्हे दाखल केले आहेत. तसेच महापालिकेच्या पथकानं अनेक ठिकाणचे अनधिकृत फलकही जप्त केले आहेत. बेकायदेशीर लावलेले होर्डिंग, बॅनर जप्त करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईलं, असं महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचं उद्धाटन काल अपर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांच्या हस्ते झालं. या महोत्सवात काल विविध स्पर्धा घेण्यात आल्या, तसंच  युवकांनी सोशल मीडियाचा वापर कसा करावा, त्याचे होणारे चांगले वाईट परिणाम, यासंदर्भात माहिती देण्यात आली.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या वसमत ग्रामीण पोलीस ठाण्यातल्या एका पोलीस जमादाराला पाच हजार रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने काल रंगेहात पकडलं. एका तक्रारदाराविरुद्ध आलेला तक्रार अर्ज कारवाई न करता निकाली काढण्यासाठी त्यानं ही लाच मागितली होती.

****

हवामान

येत्या दोन दिवसात, राज्याच्या बहुतांश भागात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर शहर आणि परिसरात आज पहाटे मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला.

****